# ॥ श्रीगुरुचरित्र आशय ॥

## अध्याय दुसरा (शिष्य दीपकाख्यान)

| | |
|---|---|
| **विचारधन :** | **विषय : पाप निष्कृति (प्रायश्चित) सिद्धांत** |

शिष्य दीपक+आख्यान (गोष्ट) ह्याचा अर्थ शिष्य दीपकाची गोष्ट. शिष्य दीपक व त्याचे गुरु वेदधर्ममुनी ह्यांची पुराणातील कथा ह्या अध्यायात सांगितलेली आहे. ह्या पुराणकथेतून शिष्य दीपकाची आदर्शवत गुरुभक्ती सन्मार्ग दाखविणारी आहे. ह्या कथेतील गुरु वेदधर्ममुनी आपल्या पूर्व जन्मातील पापाचे प्रायश्चित म्हणून कुष्ठरोगाच्या यातना भोगतात. साक्षात गुरुची सुद्धा पूर्व जन्मी आणि वर्तमान जन्मात आजपर्यंत घडलेल्या पापातून सुटका होऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आजारी गुरुच्या रुपाने दाखविताना,

**आयुष्यातील पापक्षालनाचे महान तत्व :**

ओवी क्रमांक : १७७, २१४,२१५ या ओव्यांतून दाखविलेले आहे

आपले पाप आपल्याकडे, आपले पाप मुलगा किंवा शिष्याचे नाही. जर स्वत:च्या शरीराने भोगले नाही तर ते

पाप बोलता येत नाही. पापी  माणसाला पाप भोगण्यावाचून सुटका नाही. हे पाप जन्म -जन्मांमध्ये बांधते,असे धर्मशास्त्र सांगते.

ज्यांच्या मनात मोक्षाची अपेक्षा असेल, त्यांनी पापाची नदी नाहीशी करावी.  थोडा जरी पापाचा भाग शिल्लक राहिला तर मोक्ष मार्गात अडथळा होतो.

हे श्रीगुरुचरित्रकारांनी सांगितलेले आहे.

**मीमांसा:**

**‘जन्म जन्मांतरीची ज्याची पापे ही त्यालाच भोगावी लागतात.’**

हे तत्व स्वामी विवेकानंदांचे गुरु ‘श्री रामकृष्ण परमहंस’ हे प्रत्यक्ष जगलेले दिसतात.श्री रामकृष्ण परमहंस ह्यांना कर्करोग झाल्यावर त्यांनी सर्व प्रकारची औषधे स्वतःच बंद केली. त्यांच्या दृष्टीने पूर्वजन्मींच्या पापांचे फळ म्हणून त्यांना कर्करोग झाला आणि त्यांनी कर्करोगामुळे होणाऱ्या यातना, हेच त्या पापांचे प्रायश्चित्त मानले व त्यातच  त्यांना  देवाज्ञा झाली.

पाप हे जन्म -जन्मांमध्ये बांधते,असे धर्मशास्त्र सांगते.

श्रीमद् भगवत गीता, अध्याय क्रमांक ५ मध्ये भगवान श्रीकृष्ण सांगतात,

युक्तः कर्मफलम् त्यक्-त्वा शान्तिम् आप्नोति नैष्ठिकीम् ।

अयुक्तः कामकारेण फले सक्तः निबध्यते ॥ ५ - १२ ॥

**निष्काम कर्मयोगी कर्मफळाचा त्याग करून परमशांतीला (मोक्षाला) प्राप्त होतात , पण जे कर्मयोगाचे आचरण करीत नाहीत ते कामनावश झाल्याने फळात आसक्त होऊन (जन्म-मृत्यु चक्रात ) बद्ध होतात.**

**विचारधन :** प्राचीन सिद्धांत - जीवसृष्टी ही ईश्वर निर्मित

ओवी क्रमांक ५४, ५५ - सृष्टी उत्पत्ति

ओवी क्रमांक ३४ व ३५ नुसार द्वापारयुगाच्या अंती नारायण (अर्थात) श्रीविष्णु हा व्यास झाला. त्याने सांगितलेल्या कथेनुसार, महाविष्णुच्या आज्ञेनुसार, अनादि वेदांमध्ये सांगितल्याप्रमाणे, ब्रह्मदेवाने पुढीलप्रमाणे सृष्टी निर्माण केली.

सृष्टी प्रजा - विविध स्थावर जंगम,

स्वेदज (घामापासून उत्पन्न होणारे),

अंडज (अंड्यापासून जन्माला येणारे),

जारज(गर्भाशयापासून जन्मणारे), तसेच

उद्भिज (जमिनीत उगवणारे )उत्पन्न अनुक्रमाने केले.

नंतर तीन लोक (स्वर्ग, मृत्यु,पाताळ ) निर्माण केले. ब्रह्माने सनक, ब्रह्मनिष्ट गुणी तसेच मरीच आदि निर्माण केले. तिथून पुढे देव, दैत्य (राक्षस )ह्यांची उत्पत्ती ब्रह्माने केली.

**मीमांसा :** आधुनिक सिद्धांत

दि. ३० जून १८६० रोजी ऑक्सफर्ड विद्यापीठातील म्युझियम लायब्ररी हॉलमध्ये चार्ल्स डार्विन यांनी ‘ओरिजिन ऑफ स्पेसीज बाय नॅचरल सिलेक्शन’ हा आपला जगप्रवासातून मिळविलेल्या पुराव्यांनिशी निर्माण केलेला ग्रंथ सादर करुन तत्कालिन जगाला हादरा दिला.

ह्या ग्रंथात त्यांनी

“जीवसृष्टी ही ईश्वर निर्मित नसून

निसर्गनिवडीने झालेली उत्क्रांतीय निर्मिती आहे.”

हा नवा विचार जगाला दिला. निसर्गात टिकणाऱ्या गुणांची निवड निसर्ग करतो व न टिकणाऱ्या गुणांचा त्याग करतो. अशा ह्या जीव जातींच्या प्रक्रीयेतून माणूस हा प्राणी उदयास आला, हे गृहितक मांडण्यात आले.

ह्या उत्क्रांतीच्या प्रक्रीयेतून डोळा या अवयवाची उत्क्रांती का झाली नाही? डोळा हा अवयव सर्व जीवांना विकसित कसा मिळाला? ह्या प्रश्नाने माणसाला अजून जीव सृष्टीनिर्मितीचे गुढ समजलेले नाही, हे निश्चित दिसते.

प्राचीन भारतीय लोकांच्या निरिक्षणांवरुन अंडज, जारज वगैरे पद्धतीने जीव सृष्टीची उत्पत्ति, तसेच आत्मन् ,ब्रह्मन् ह्या अध्यात्मात असलेल्या संकल्पना, व धर्मशास्त्र तयार झालेले असावे.

"If anything that can not be measured, it is not of scientific interest." ... Lord Kelvin.

शास्त्रज्ञ लॉर्ड केल्विन यांच्यामते ,’कुठलीही गोष्ट प्रयोगाच्या माध्यमाने वेळोवेळी सिद्ध करता आली तरच तो वैज्ञानिक सिद्धांत म्हणून मांडता येतो.’

सद्यस्थितीत जीवसृष्टी निर्मितीचे चार्लस डार्विन यांचे निसर्ग निर्मित सृष्टी, तसेच प्राचीन भारतीय अध्यामातील ईश्वर निर्मित सृष्टी रचना, ही दोन्ही परस्पर विरोधी मते सिद्धांत नसून संकल्पना आहेत.

**विचारधन :** कृत, त्रेता, द्वापार, कलि ही चार युगे पृथ्वीवर ब्रह्मदेवाने पाठविली. (ओवी क्रमांक ६० ते ७५)

**मीमांसा :** मानवी मनाचे गुणदोष शोधून, त्याप्रमाणे समाजमनाची झालेली स्थित्यंतरे, ह्या युगांच्या रुपात दिसतात. माणसाच्या

मनातील चांगल्या व वाईट दोन्ही प्रवृत्ति धर्मशास्त्राने मान्य करुन मानवी मनाची उत्क्रांती सन्मार्गाकडे नेण्याचा प्रयत्न ह्या युगांच्या रुपात (कालखंडात झालेला) दिसतो.

**विचारधन :** कृत युग (ओवी क्रमांक ६३,६४,६५, ६८ )

पृथ्वीवर ब्रह्माने प्रथम कृतयुग पाठविले. कृत (सत्य) युगाच्या वाणीत असत्यवचन कधीही नव्हते. वैराग्यपूर्ण ज्ञानी असलेल्या या कृतयुगाचा यज्ञोपवित (जानवे) हाच अलंकार.हातात कंकणासारखी रुद्राक्ष माळा. असे हे सत्वगुणी युग थोडा काळ भूमीवर होते.

**मीमांसा :** सत्य युगात मनुष्याचे समाज जीवन सत्याच्या बैठकीवर सुरु झाले असावे. परंतु हे 'सत्य वादी' उच्च विचार फार थोडा काळ टिकलेले दिसतात, परत माणसाच्या मनाचा कल असत्याकडे झुकला असावा.

| विचारधन : सत्य युग (ओवी क्रमांक ६६,६७ ) |
|---|
| ब्रह्मदेवा, आपण संदेश दिला की, ”तुझे वर्तन सत्त्वगुणाचे असेल, केव्हा केव्हा, कोठे कोठे प्रसंगी तुला जाणले जाईल. (हे सगळ) तुझ्या आटोक्याबाहेरचे आहे, तू करु शकत नाहीस ते तू जाण,त्यासाठी (मी) आणखीन युग पाठवीन. तुला दक्ष रहावे लागेल म्हणून (मी) भूमीवर पाठवीत आहे.” |
| मीमांसा : माणसाच्या व्यवहारात सत्त्वगुणास सर्वसाधारण विरोध असतो. गरज असली तरच सत्याचा स्विकार माणूस करतो. हा माणसाचा व्यवहार, सत्याच्या बैठकीवर सुरु झालेल्या समाजास पचविणे कठीण गेले असेल. |

| विचारधन : त्रेता युग (ओवी क्रमांक ६९, ७०, ७१ ) |
|---|
| त्यानंतर दुसरे युग - त्रेतायुग ब्रह्मदेवाने भूमीवर |

| |
|---|
| पाठविले. शरीराने स्थूल असलेले व त्याच्या हातात यज्ञसामुग्री तसेच बैल धरलेला, सदैव धर्मप्रवर्तक संदेश देत, भूमीवर आनंदात एक युग (त्रेतायुग ) संपले. |
| **मीमांसा :** त्रेतायुगात शेतीतंत्रज्ञानाची निर्मिती झाल्याने, समाज स्वास्थ्य निर्माण झाले असावे. फक्त त्रेतायुगाचे स्थूल शरीर असे वर्णन समाज स्वास्थ्याचे द्योतक असावे, असे वाटते.माणसाच्या मनात सूर्य, चंद्र, अग्नी, इंद्र, वरुण इत्यादी देवतांविषयी कृतज्ञता निर्माण झाली असावी. ज्याप्रमाणे सूर्य हा प्रकाशाचे आकाशातील प्रतीक आहे, त्याप्रमाणे पृथ्वीवरील प्रकाशाचे प्रतीक म्हणून अग्नीस महत्व आले. अग्नीस ईश्वराचा प्रतिनिधी मानला जाऊन यज्ञाद्वारे उपासना पद्धति सुरु झाली असावी. त्रेतायुगाला धर्मप्रर्वतक म्हटले आहे, ह्याचा अर्थ समाजाची धारणा करणारा - धर्म उदयास आला असावा. |

| | |
|---|---|
| **विचारधन :** द्वापार युग (ओवी क्रमांक ७३, ७४ ) | |
| त्यानंतर ब्रह्मदेवाने तिसरे द्वापारयुग भूमीवर पाठविले. द्वापारयुग हे एका हातात खड्ग (तलवार )व खट्वांग ( बाजेच्या खुरासारखे आयुध) धरलेला व दुसऱ्या हातात धनुष्य बाण असलेला, त्याचे मन उग्र,शांत, निष्ठुर, दयावान अशा दोन्ही स्वभावाचे आहे. पुण्य व पाप समान पहाणारा, शुध्द स्वरूपाचे द्वापार युग काही काळ भूमीवर राहिले. | |
| **मीमांसा :** शेतीमुळे माणसाची आर्थिक प्रगती झाली. शेतीच्या अवजारांबरोबर, शस्त्र निर्मिती झाली असावी. शस्त्र हातात आल्यावर मानवी मनातील अहंकाराने डोके वर काढले असावे. माणसाला हातातील शस्त्राने सत्ता दिली, तर बैल वगैरे प्राण्यांच्या उपयोगाने आर्थिक सुबत्ता आल्याने, माणसाच्या मनातील अहंकार पाप -पुण्य,उग्र-शांत, निष्ठुर-दया ह्या विरुद्ध भावनांना समान दृष्टीने | |

पहायला लागला असावा. इथेच खरी समाजमनाची कलियुगाकडे अधोगतीकडे वाटचाल सुरु झाली असावी.

प्रगती बरोबर अहंकारातून अधोगती जन्म घेते.

**विचारधन :** कलियुग (ओवी क्रमांक ७५,७७, ७८,७९, ८०, ८१,८२)

द्वापार युग संपल्यावर ब्रह्माने कलियुगाला पृथ्वीवर जाण्यासाठी बोलाविले.

विचारहीन,अंत:करणाचा,पिशाच्यासारख्या वदनाचा,खाली मान घातलेला,जागोजागी धडपणारा, क्रूर, वैराग्यशुन्य, आपल्याबरोबर कलह (भांडणे) द्वेष घेऊन, डाव्या हातात शिश्न धरुन ब्रह्मासमोर आला.उजव्या हातात जीभ धरुन अतिशय आंनदाने नाचत, दोषाचीही स्तुति करणारा, पुण्य पापाची भेसळ असलेला, वाकुल्या दाखवत, हंसत,रडत,जीभ तोंड वाकडे करीत,ब्रह्मा समोर उभा राहिला व विचारु लागला,”आज्ञा काय ?”

| |
|---|
| ब्रह्माने विचारले ,"लिंग  व जीभ का धरली आहेस ?" कलियुग ब्रह्मास म्हणाले ,"मी सर्व लोकांना जिंकीन. जे लोक लिंग व जीभ यांचे रक्षण करतील,त्यांच्या समोर मी हारीन." |
| **मीमांसा :** कलियुगांत कामवासना व वाणी तसेच जिभेचे चोचले (आहार)यांच्यावर संयम पाळल्यास त्रास होणार नाही असे दिसते. |

| |
|---|
| **विचारधन :** कलियुग (ओवी क्रमांक ८५, ८६,८७, ८८, ८९ ) |
| कलियुग ब्रह्मास म्हणाले ,"मी धर्म नाश करीन .मी स्वच्छंदी ,निरानंदी असून निद्रा ,कलह हेच माझे प्राण आहेत. समाजात दुसऱ्याचे द्रव्य हरणारे व परस्त्रीत  रमणारे माझे दोघे बंधू  आहेत. प्रपंचात मत्सर, ढोंग करणारे  माझे प्राणसखे असतील.बगळ्यासारखे ढोंगी संन्यासी माझे प्राण असतील ,कपट करुन पोटाच्या पोषणार्थ मिळवतील. हेच माझे प्राण सखे आहेत, तसेच जे पुण्यजन असतील तेच माझे वैरी जाणा." |

**मीमांसा :**

प्रत्येक युगाला ब्रह्मदेव सांगतो,तू तुझ्या गुणांची जाणीव करुन दे. कलियुगात माणसाचे मन वाईट प्रवृत्तींकडे झपाट्याने ओढले जात आहे.

**विचारधन :** कलियुग (ओवी क्रमांक ९७ )

पाचशे भूमंडळातील भरतखंडात पुण्य खूप आहे. माझ्यासारख्याला पाहून ते मला (कलियुगाला) मारतील (तर त्याठिकाणी मी) कसा जाऊ ?"असे म्हणाला.

**मीमांसा :**

पंचाशत म्हणजे पाचशे भूमंडळातील भरतखंडात खूप पुण्य आहे. येथे 'भूमंडळ' या शब्दातील भू म्हणजे जमीन व मंडळ म्हणजे गोल. ह्याचा अर्थ जमीनीचा गोल व त्यावरील भरत खंड. अर्थातच भरतखंडामुळे हा जमीनीचा गोल म्हणजे आपली पृथ्वी हा ग्रह. असे पाचशे ग्रह त्याकाळी माहित झाले असावेत, असे दिसते. परंतू ह्या पाचशे ग्रहांच्या आकड्याचा

प्राचीन पुरावा आम्हाला मिळालेला नाही.

केपलर १८६ एफ : पृथ्वीसदृश्य मानवी वास्तव्यास अनुकुल ग्रह

पृथ्वीपासून ५०० प्रकाशवर्षे दूर असलेल्या, हंस तारकासमूहात पृथ्वीसदृश्य खडकाळ ग्रह, नासाला दुर्बीणीच्या सहाय्याने दिसला आहे. हा ग्रह त्याच्या मातृताऱ्याभोवती १३० दिवसात प्रदक्षिणा पूर्ण करतो, ह्याचा अर्थ ह्या ग्रहावर एक वर्ष १३० दिवसांचे असते. हा लाल रंगाचा ग्रह पृथ्वीपेक्षा १० टक्के मोठा असून त्यावर द्रवरुप पाणी असल्याने मानवी वास्तव्यास अनुकुल असावा. ह्या ग्रहाचे नाव केपलर १८६ एफ असे नासा ह्या संस्थेने ठेवले आहे.

केपलर १८६ एफ सारखे पृथ्वीसदृश्य, मानवी वास्तव्यास योग्य, ५०० ग्रह प्राचीन भारतीयांस माहित असावेत असे दिसते.

कलि म्हणतो, "भरतखंडात खूप पुण्य आहे"- ह्यावरुन दिसते पृथ्वीवरची जमीन निरनिराळ्या खंडात विभागलेली आहे. हे त्या लोकांना माहित होते. आपल्याला माहित आहे की भरतखंड हे नाव भारत ह्या शब्दावरुन आलेले आहे. यातील भाः म्हणजे दिव्य प्रकाश व रत म्हणजे गुंतलेला,

रमलेला, तसेच प्रकाश म्हणजे ज्ञान.

भारत  हा शब्द भाः+ रत ह्याचा अर्थ दिव्य प्रकाशात म्हणजे दिव्य ज्ञानात रममाण झालेला भारत.  अध्यात्म विद्येचा अभ्यास त्याकाळात पृथ्वीवरील फक्त भरतखंडात होत असावा. पृथ्वीवरील इतर खंडात त्याकाळात अध्यात्म विद्येचा प्रसार झालेला दिसत नाही. पृथ्वी ह्या ग्रहावरील भरतखंडावरील लोक अध्यात्म विद्येत रममाण होत असल्याने, कलि ब्रह्मदेवास सांगतो, भरतखंडात खूप पुण्य आहे.

**विचारधन :** कलियुग (ओवी क्रमांक१२२, १२३, १२४, १२५, १२६,१२७ )

ब्रह्माने कलिस सांगितले,

"अंत:करणात धैर्य धरून, शुद्ध बुद्धी वापरून जे लोक वागतात, लोभापासून दूर रहातात, त्यांना कोणताही दोष लागत नाही. जे लोक हरिहरास भजतात किंवा काशी क्षेत्री वास करतात, गुरुंची निरंतर सेवा करतात, त्यांना तुझा दोष लागत नाही.

मातापित्यांची सेवा करतात, किंवा ब्राह्मणाची सेवा करतात ,तसेच गायत्री मंत्र व कपिला गाय यांना भजणाऱ्यांना तुझा दोष लागत नाही. जे विष्णूभक्त अथवा शिवभक्त आहेत, जे नियमित तुळशीची सेवा करतात ,त्यांना तू बाधू नकोस अशी माझी आज्ञा आहे.जे पुरुष गुरुसेवक आहेत, पुराण ऐकतात, सर्व साधनासह धर्माप्रमाणे वागतात, त्यांना तू बाधू नकोस. शास्त्रपरायणाप्रमाणे सुकृती (सत्कृत्य )करतात, वंशपरंपरेने गुरुंची सेवा करतात विचारपूर्वक विवेकाने वागून धर्म पाळतात, त्यांना तू बाधू नकोस."

**मीमांसा :**

माणूस सन्मार्गाने चालल्यास, कलियुगाचा त्रास होणार नाही. हा सन्मार्ग गुरुसारखा अनुभवी, तज्ञ, अधिकारी माणूस दाखवू शकतो.

**विचारधन :** गुरु माहात्म्य (ओवी क्रमांक१२९ ते १४२, २३८)

कलीचे बोलणे ऐकून ब्रह्मा, आपण सांगितले,

गुरु ह्या शब्दाचा अर्थ :“ग शब्दाचा अर्थ सिद्ध जाण, र कार हा पापांना जाळणारा , ‘उ कार’ विष्णू अदृश्य. ब्रह्मा व रुद्र हे केवळ स्वतः गुरु निश्चित आहेत. तीन आत्मक असणारे श्रीगुरुचे रूप सत्य आहे.”

गणेशाला गुरु म्हणतात. तसाच अग्नी गुरु आहे. अशाच प्रकारे शार्ङ्गधरु गुरु जाण. (शारङ्गधर = भगवान् श्रीकृष्ण = श्रीविष्णुचा अवतार शार म्हणजे हिरव्या रंगाच्या अनेक छटा. ( शारम् अङ्गम् यस्य सः = भारतीय मोर पक्षी ) शारङ्गधर म्हणजे मोराच्या पिसांचा मुकुट धारण केलेला वसुदेवाचा पुत्र वासुदेव म्हणजेच भगवान श्रीकृष्ण.)

शिवशंकरापेक्षा गुरु श्रेष्ठ होय. कारण शिव संतापला, तर गुरु त्याचे निवारण अथवा समाधान करेल. पण जर गुरुच संतापला तर मग त्याचे समाधान कोणीही करु शकणार नाही.

गुरु पिता आहे ,माता आहे ,गुरु हाच निश्चित शंकर

आहे. ईश्वर जरी (एखाद्यावर) कोपला (रागावला) तर गुरु त्याचे रक्षण करील.गुरु एखाद्याला रागवला तर ईश्वर त्याचे रक्षण करणार नाही, हे ऐकलेले आहे. त्याला जरी ईश्वर कोपला रागावला तर त्या (व्यक्ति)चे श्रीगुरु निश्चित रक्षण करील.

ब्रह्मदेव, विष्णुदेव तसेच महादेव शंकर हे त्या महान गुरुचे प्रतिनिधी आहेत.तो महान गुरु म्हणजे साक्षात ब्रह्मन् च आहे म्हणून त्या परमगुरुला आपण सारे वंदन करुया.

गुरु ब्रह्मा आहे, हे सत्य जाण. तोच शंकर आहे, तोच महाविष्णू आहे.गुरुच ह्या सत्याचे साधन आहे, म्हणून गुरुचा आश्रय घ्यावा.

आचारधर्म,वर्णाश्रमांना, विवेकी कर्म मार्गांना,वैराग्ययुक्त भक्तिला गुरुच मार्ग दाखविणार.

श्रीविष्णु उवाच,"जो मनुष्य गुरुभक्त आहे, तोच माझा प्राण असेल, हे जाण. त्याच्या आपण (श्रीविष्णु)अधीन झालेलो असतो. जे जे मागेल ते ते मी द्यावे."

| ओवी क्रमांक | विचारधन : शिष्य दीपकाची दृढ गुरुभक्ति |
|---|---|
| २०४ | तीर्थयात्रा आणि देवयात्रा, देहयात्रा आणि लोकयात्रा न करिता रात्रंदिवस, गुरुला साक्षात ब्रह्मा ,विष्णु ,महेश (त्रिमूर्ती) मानून, शिष्याने, गुरुला शरण जाऊन दुसऱ्या कोणाची सेवा न करता केवळ गुरुची सेवा मोठ्या श्रद्धेने आणि निष्ठेने केली. |
| | **मीमांसा :**<br>श्रीमद् भगवत गीतेत अध्याय ५ मध्ये सांगितल्याप्रमाणे<br>**कायेन मनसा बुद्-ध्या केवलैः इन्द्रियैः अपि ।**<br>**योगिनः कर्म कुर्वन्ति सङ्गम् त्यक्-त्वा आत्मशुध्दये**<br>**॥ ५ - ११ ॥**<br>**निष्कामकर्मयोगी आत्म ( चित्त ) शुद्धीकरता शरीराने , मनाने , बुद्धीने आणि इंद्रियांनी केवळ आसक्ती सोडून कर्म करीत असतात .**<br>शिष्य दीपकाने गुरु वेदधर्म मुनीची सेवा केली.ब्रह्मा, विष्णु आणि महेश या त्रिमूर्तीला बुद्धीने म्हणजेच चर्मचक्षूंनी नव्हे तर ज्ञानचक्षूंनी गुरुला साक्षात ब्रह्मन् / |

| | |
|---|---|
| | परमात्मा / परमेश्वर मानून शिष्याने गुरुला शरण जाऊन दुसऱ्या कोणाची सेवा न करता केवळ गुरुची सेवा मोठ्या श्रद्धेने आणि निष्ठेने केली. |

अध्याय दुसरा संदेश –

पूर्व जन्मी आणि वर्तमान जन्मात आजपर्यंत घडलेल्या पापातून सुटका होऊ शकत नाही.

ज्यांच्या मनात मोक्षाची अपेक्षा असेल, त्यांनी पापाची नदी नाहीशी करावी.  थोडा जरी पापाचा भाग शिल्लक राहिला तर मोक्ष मार्गात अडथळा होतो.

ज्ञानचक्षूंनी  गुरुला साक्षात परमेश्वर मानून गुरुची सेवा मोठ्या श्रद्धेने आणि निष्ठेने करावी.

ज्ञान हेच आयुष्यात सन्मार्ग दर्शक आहे.